# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:29.01.2025** **वारःबुधवार**

**ठळक बातम्या**

- इस्त्रोच्या शंभराव्या अग्निबाणाचं आज सकाळी यशस्वी प्रक्षेपण
- जीबीएसच्या रुग्णांवर उपचारासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये विशेष व्यवस्था करण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना
- या वर्षापासून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाचं आयोजन
- 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं पंतप्रधानांच्या हस्ते डेहराडूनमध्ये उद्घाटन

  आणि

- अहिल्यानगरमध्ये रंगणार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार

**इस्त्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोनं आज सकाळी सहा वाजून 23 मिनिटांनी जीएसएलव्ही एफ - फिफ्टीन या शंभराव्या अग्निबाणाचं यशस्वी प्रक्षेपण करत, अग्नीबाण प्रक्षेपणाची ऐतिहासिक शतकपूर्ती केली. श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून एनव्हीएस झिरो टू हा उपग्रह घेऊन जाणाऱ्या या अग्निबाणानं यशस्वी उड्डाण केलं. एनव्हीएस झिरो टू हा उपग्रह दूरसंचार, दिशादर्शन आणि हवामान क्षेत्रासाठी उपयुक्त ठरणार आहे.

**जीबीएस**

गुईलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये विशेष व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत काल या आजाराबाबत आढावा घेण्यात आला; त्यावेळी ते बोलत होते. या आजारावर केले जाणारे उपचार महात्मा

ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट आहेत. अजून काही प्रक्रिया करायची असेल तर सार्वजनिक आरोग्य विभागानं ती करावी, असं त्यांनी सांगितलं. दूषित पाण्यामुळे या रोगाची लागण झाली असल्याचं प्राथमिक अहवालात दिसून येत आहे; त्यामुळे पाणी उकळून प्यावं आणि न शिजवलेलं अन्न, मांस खाणं टाळावं असं आवाहन करण्याची सूचना त्यांनी आरोग्य विभागाला केली. दरम्यान शासकीय दवाखान्यामध्ये या आजाराच्या उपचारासाठी सर्व यंत्रणा सज्ज आहे, आरोग्य विभाग आणि महापालिकेतील आरोग्य यंत्रणा यांनी समन्वय साधून काम करावं असे निर्देश वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले आहेत. वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेच्या पथकाने पुण्यात पाहणी केली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याशी चर्चा करून आढावा घेतला. गुलियन बॅरी सिंड्रोमच्या रुग्णांसाठी महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार होणार आहेत. तर खासगी रुग्णालयातील रुग्णांना 'शहरी गरीब योजने'तून दोन लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाणार आहे. या आजारासाठी दिलं जाणारं 'इम्युनोग्लोब्यूलिन' हे इंजेक्शन देखील मोफत उपलब्ध करून दिलं जाईल, अशी माहिती मोहोळ यांनी दिली. दरम्यान राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांची संख्या 110 झाली आहे. सध्या 13 रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये जीबीएस आजाराचे 15 संशयित रुग्ण आहेत, तर कोल्हापूरमध्ये या आजाराचे दोन रुग्ण आढळून आले आहेत. सोलापूरमध्ये एका संशयित रुग्णाचा मृत्यू झाला आहे, त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल तातडीने पत्रकार परिषद घेत लोकांना या आजाराविषयीची माहिती दिली. या आजारामुळे घाबरून न जाता काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**मंत्रिमंडळ**

मुंबईतल्या अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवरचा 250 रुपयांचा पथकर आणखी एक वर्षासाठी कायम ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला.

**विधी महाविद्यालय**

उत्तम वकील तयार करण्यासाठी चांगली महाविद्यालयं आणि अनुभवी गुरुजन वर्गाची आवश्यकता असल्याचं  प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरमध्ये केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या शताब्दी समारंभात ते बोलत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. सामान्यांना वेळेत न्याय देणारे विद्यार्थी या महाविद्यालयातून घडावेत, अशी अपेक्षा नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

**मराठी चित्रपट**

मराठी चित्रपट क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी यावर्षीपासून राज्य शासन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाचं आयोजन करणार असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲडवोकेट आशिष शेलार यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत केली. यावर्षीचा पहिला चित्रपट महोत्सव मुंबईत होणार असून त्याच्या तारखा आणि नियमावली लवकरच जाहीर करण्यात येईल असं शेलार म्हणाले. साठाव्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या प्राथमिक फेरीची नामांकनं आणि तांत्रिक तसंच बालकलाकार विभागातले पुरस्कारही यावेळी जाहीर करण्यात आले.

**तर्क तीर्थ लक्ष्मण शास्त्री जयंती**

थोर विचारवंत, मराठी विश्वकोशाचे माजी अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची 125 वी जयंती वाईमध्ये प्राज्ञपाठशाळा मंडळात नुकतीच साजरी करण्यात आली. या निमित्तानं व्याख्यानाचंही आयोजन करण्यात आलं होतं, तसंच लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावरील टपाल पाकिटाचं प्रकाशनही झालं. या निमित्तानं लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्याचं स्मरण करताना प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या अध्यक्ष डॉक्टर सरोजा भाटे म्हणाल्या .......

**तर्कतीर्थांच्या स्मृतीची प्रस्तुतता आजच्या काळामध्ये या कारणासाठी आहे, की मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या विकासासाठी एक शास्त्रीय परिभाषा म्हणून ती विकसित होण्याची गरज आहे. आणि तर्कतीर्थांच्या वाङ्मयाचं हे एक वैशिष्ट्य आहे की त्यांनी शास्त्रीय परिभाषा मराठीमध्ये विकसित केली ती आज विद्यार्थ्यांना अभ्यासकांना अतिशय उपयुक्त आहे.  आणि त्यासाठी त्यांनी त्यांच्या साहित्याचं आलोडन करणं अत्यंत गरजेचं आहे असं मला वाटतं.**

**निर्णय रद्द**

राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दुसरी ते 8 वीच्या पुस्तकांमध्ये वह्यांची कोरी पाने लावण्याचा निर्णय राज्य सरकारनं रद्द केला आहे. येत्या शैक्षणिक वर्षांपासून पाठ्यपुस्तकांमध्ये कोरी पाने न लावण्याचा शासन आदेश सरकारनं काल जारी  केला. पाठ्यपुस्तकांमध्ये लावलेल्या कोऱ्या पानांचा विद्यार्थ्यांनी उपयोग केला नाही. त्यामुळं सरकारनं पाठ्यपुस्तकात वह्यांची कोरी पानं लावण्याचा निर्णय सरकारनं रद्द केला.

**मराठी भाषा**

मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने राज्यभरात मराठी भाषा पंधरवडा राबवण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयात काल 'पुस्तक प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं. यासह 'ग्रंथदान' हा उपक्रम देखील राबवण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रदर्शनाला भेट देऊन ग्रंथदान करण्याचं आवाहन केलं. रत्नागिरीमध्येही नगर परिषदेच्या दामले

विद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त काल एक कार्यक्रम झाला. मराठी भाषेतून घेतलेलं शिक्षण विद्यार्थ्याला समृद्ध करतं, असं प्रतिपादन उपजिल्हाधिकारी शुभांगी साठे यांनी यावेळी केलं. या निमित्तानं पुस्तक प्रदर्शन, ग्रंथदिंडी असे विविध उपक्रमही घेण्यात आले.

**पुणे म्हाडा सोडत**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळातर्फे गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये जाहीर करण्यात आलेल्या सोडतीचा कार्यक्रम मंत्रालयात आज ऑनलाइन पद्धतीने  होणार आहे. उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ही सोडत होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती  असेल. 3662 सदनिकांसाठीच्य या सोडतीसाठी एकंदर 93 हजार 662 अर्ज आले होते. 71 हजार 642 अर्जदारांनी अनामत रक्कम भरली असून, त्यांचा सोडतीत समावेश केला आहे.

**राष्ट्रीय क्रीडा**

38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल उत्तराखंडमध्ये डेहराडून इथल्या महाराणा प्रताप मैदानावर झालं. हरित खेळ ही यंदाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेची मध्यवर्ती संकल्पना आहे. उत्तराखंडमधल्या आठ जिल्ह्यात 11 शहरांत येत्या 14 फेब्रुवारीपर्यंत ही क्रीडा स्पर्धा होणार आहे. योग आणि मल्लखांब या खेळांचा पहिल्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये समावेश केला आहे.  या स्पर्धेत देशातले सुमारे 10 हजार खेळाडू सहभागी झाले आहेत.

**महाराष्ट्र केसरी**

यंदाची महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आजपासून अहिल्यानगरला सुरू होत आहे. येत्या 2 फेब्रुवारीपर्यंत राज्यभरातल्या मल्लांमध्ये, माती आणि गादी या दोन्ही प्रकारांमध्ये हा कुस्त्यांचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेसाठी वाडियापार्क मैदानावर उभारण्यात आलेल्या बलभीमअण्णा जगताप क्रीडा नगरीत भव्य मंच आणि प्रवेशद्वार उभारण्यात आलं आहे. जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्राध्यापक डॉक्टर संतोष भुजबळ यांनी या स्पर्धेबाबत आकाशवाणीला अधिक माहिती दिली. ते म्हणाले......

**या स्पर्धेत 43 जिल्ह्यातून मॅटवर 10 आणि माती वर 10 असे 20 मल्ल चमू प्रत्येक जिल्ह्यातून येणार आहे, आणि टोटल खेळाडू 860 सहभागी होणार गादी आणि माती वर मिळून 7 मेडल आपण देणार आहोत   गादी वर गोल्ड सिल्व्हर असे दोन मेडल म्हणून 4 मेडल आणि मातीवरती 1 गोल्ड 1 सिल्व्हर 1 ब्राँझ मेडल असे 3 मेडल म्हणजे एकूण 7 मेडल आपण एका वजना साठी देणार आहोत आणि महाराष्ट्र केसरी मान मिळवणाऱ्या त्याला एक ढाल आणि चांदीची गदा आणि उप महाविजेत्याला  देणार बोलेरो मिळणार आहे, अस मोजकं नेटक असं या स्पर्धेचे नियोजन केले आहे, या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्राला कुस्तीचा थरार पाहायला मिळणार आहे.**

**क्रिकेट - भारत इंग्लंड**

भारत आणि इंग्लंड यांच्यात काल राजकोट इथल्या निरंजन शाह मैदानावर झालेल्या तिसऱ्या 20 षटकांच्या क्रिकेट सामन्यात इंग्लंडनं भारताचा 26 धावांनी पराभव केला. इंग्लंडनं दिलेल्या 172 धावांचं उद्दिष्ट गाठताना भारतीय संघानं निर्धारित 20 षटकांत नऊ गडी गमावून केवळ 145धावा केल्या. या पराभवानंतरही, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ पाच सामन्यांच्या या मालिकेत 2-1 नं आघाडीवर आहे. मालिकेतला चौथा सामना शुक्रवारी पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार आहे.

**हवामान**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार**.